सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# महसूल विभाग



## विभागीय आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालय (करमणूक शुल्क शाखा)

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, भारत प्रतिभूती मुद्रणालयासमोर, नाशिकरोड, ता.जि.नाशिक-४२२ १०१

Email Id- crunsk-divcom@mah.gov.in व dycomentnashik@gmail.com     दुरध्वनी क्र. ०२५३-२४६२४०१-५

क्र.कक्ष-15/क.शु.1/ज.या.176-2012/कावि/423/2023     नाशिकरोड दि.06 /09/2023

**इमेलव्दारे**

**प्रति,**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक | १०. | मुख्य अभियंता, निर्मिती, ना.औ.विद्युत केंद्र एकलहरे |
| २. | जिल्हाधिकारी, नाशिक | ११. | सहसंचालक नगररचना, नाशिक विभाग नाशिक |
| ३. | पोलिस आयुक्त, नाशिक | १२. | उपसंचालक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, नाशिक |
| ४. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक | १३. | शिक्षण उप संचालक, नाशिक विभाग नाशिक |
| ५. | प्रादेशिक अधिकारी, महा.प्र.नि.मं.(MPCB) नाशिक | १४. | मुख्याधिकारी, देवळाली छावणी, नाशिक |
| ६. | अधिक्षक अभियंता व प्रशासक (CADA) जलसंपदा विभाग नाशिक | १५. | जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक |
| | | १६ | निरी (NEERI) मुंबई यांचे प्रतिनिधी |
| ७. | उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, नाशिक | १७. | डॉ. प्राजक्ता बस्ते, प्राचार्य आर्किटेक्चर कॉलेज नाशिक |
| ८. | कार्यकारी अभियंता, महा.औ.वि.म.(MIDC) नाशिक | १८. | श्री. राजेश पंडीत, याचिकाकर्ते |
| ९. | मुख्य कार्यकारी अधिकारी, ना.म्यु.स्मार्ट सिटी नाशिक | १९. | श्री. निशिकांत पगारे, याचिकाकर्ते |

विषय :- **गोदावरी नदीचे प्रदूषण नियंत्रणाबाबत आढावा बैठकीचे इतिवृत्त..**
मा.उच्च न्यायालय मुंबई जनहित याचिका क्र.१७६/२०१२ संदर्भात..

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, गोदावरी नदी प्रदूषण बाबत जनहित याचिका क्र.१७६/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.१८ डिसेंबर, २०१८ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गोदावरी नदी प्रदूषण नियंत्रणाबाबत समितीची त्रैमासिक आढावा बैठक दिनांक २४ ऑगस्ट, २०२३ रोजी घेण्यात आलेली आहे. सदर बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

बैठकीतील सुचने प्रमाणे आपण केलेल्या / करत असलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल संबधीत कागदपत्र, छायाचित्रांसह या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

Signed by Tate Rani Tukaram
Date: 06-09-2023 12:11:33
Reason: Approved

( डॉ. राणी ताटे )
**उपआयुक्त (करमणुक शुल्क)**
**विभागीय आयुक्त नाशिक करिता**

**टिप :- विभागीय आयुक्त कार्यालयात ई-ऑफिस प्रणाली सुरु झालेली आहे. तरी कृपया आपलेकडून या कार्यालयास करण्यात येणारा पत्रव्यवहार हा ई-ऑफिस प्रणालीव्दारे विभागीय आयुक्त कार्यालयाचे ई-ऑफिस POURNIMA ANIL BURKUL यावर अथवा ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित नसल्यास crunsk-divcom@mah.gov.in या इमेल आयडीवर पाठवावा.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे कार्यालय

**मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र.176/2012 संदर्भात विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गोदावरी नदी प्रदुषण नियंत्रणाबाबत दि.24/08/2023 रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त**

**---X-X-X-X---**

गोदावरी नदी प्रदुषण नियंत्रणाबाबत आढावा घेणेसाठी श्री. राधाकृष्ण गमे, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली **दि.24/08/2023 रोजी सकाळी** 11.00 **वाजता** विभागीय आयुक्त कार्यालय येथील समिती कक्षात बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थिती आहेत.

1. श्री. जलज शर्मा, जिल्हाधिकारी, नाशिक
2. श्रीमती आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
3. डॉ. राणी ताटे, उप आयुक्त (करमणूक शुल्क) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
4. डॉ. नितीन गोयल, प्रमुख शास्त्रज्ञ, निरी (NEERI) मुंबई
5. श्री. दिपक पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
6. श्री. अमर दुर्गुळे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक
7. श्री. नितीन पूणेकर, मुख्य अभियंता, निर्मिती, नाशिक औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे
8. श्री. जयवंत बोरसे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ नाशिक
9. श्री. ज्ञा.ना.इगवे, उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय नाशिक
10. श्री. प्र.रा.लोधे, सहाय्यक अधिक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग नाशिक
11. श्री. एन.व्ही.बगाडे, पोलिस निरिक्षक पंचवटी पो.स्टे., प्रतिनिधी पोलिस आयुक्त नाशिक
12. श्री. स्वप्नील क्षत्रिय, सहाय्यक अभियंता, प्रतिनिधी मुख्याधिकारी, छावणी परिषद देवळाली
13. श्री. प्रविण बधान, कनिष्ठ भूवैज्ञनिक, प्रतिनिधी, उपसंचालक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, नाशिक
14. श्री. शाम विठ्ठल गोसावी, सहआयुक्त, नगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
15. श्री. विजयकुमार मुंडे, उपआयुक्त (गो.सं.क.), महानगरपालिका, नाशिक
16. श्री. उदय धर्माधिकारी, अधिक्षक अभियंता (वि.व यां.), महानगरपालिका, नाशिक
17. श्री. गणेश मैड, कार्यकारी अभियंता (सा.आ.अ.वि.), महानगरपालिका, नाशिक
18. श्री. बाजीराव माळी, कार्यकारी अभियंता (यां.), महानगरपालिका, नाशिक
19. डॉ. कल्पना कुटे, संचालक, घनकचरा व्यवस्थापन, महानगरपालिका, नाशिक
20. श्री. सुमंत ग. मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, ना.म्यु.स्मार्ट सिटी डेव्ह.कॉ.लि. नाशिक
21. श्री. एल.डी.सोनवणे, सहाय्यक संचालक, प्रतिनिधी शिक्षण उपसंचालक, नाशिक
22. श्रीमती मोहिनी राणे, सहाय्यक संचालक, विभागीय माहिती कार्यालय नाशिक
23. श्री. विलास एम. बोडके, जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक
24. श्री. संदीप एन. जाधव, स्वच्छतातज्ञ, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद नाशिक
25. श्री. गणेश शिरसाठ, प्रतिनिधी, सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग नाशिक
26. श्री. विनोद आर. पवळे, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक
27. श्री. नितीन चौधरी, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक

28. श्रीमती भक्ती ललित सपकाळे, वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ, नाशिक औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे
29. श्री. भुषण पाटील, कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ, नाशिक औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे
30. डॉ. प्राजक्ता बस्ते, तज्ञ सल्लागार, प्राचार्या आर्किटेक्चर कॉलेज नाशिक
31. श्री. राजेश पंडीत, याचिकाकर्ते
32. श्री. निशिकांत पगारे, याचिकाकर्ते

बैठकीच्या सुरुवातीस उपस्थिती बाबत आढावा घेण्यात आला. महापालिका आयुक्त हे मुंबईला गेले असले बाबत मनपाचे उपआयुक्त श्री. मुंडे यांनी नमुद केले.

➢ महापालिका आयुक्त यांनी अगोदर कळविले असते तर बैठक Reschedule करता आली असती, बैठकीतील महत्वाचे विषय हे महापालिके संबंधीत असल्याने निर्णय घेण्यासाठी ते बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक आहे. महापालिका आयुक्त नसल्याने त्यांचेशिवाय बैठक घ्यावयाची किंवा पुढे ढकलून नंतर घ्यावयाची याबाबत समिती सदस्यांना विचारणा करण्यात आली.

महापालिकेचे विषय वगळून उर्वरीत विषयांची बैठक घेण्याबाबत समिती सदस्यांनी नमुद केले. त्यामुळे महापालिका आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त असलेल्या उपसमितीने केलेल्या कार्यवाहीचा आढावा महापालिका आयुक्त हे बैठकीस गैरहजर असल्याने घेता आला नाही. बैठकीत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

| अ. क्र. | मुद्याशी संबंधीत उपसमिती/विभाग | मुद्याबाबत झालेली चर्चा व दिलेल्या सूचना | कार्यवाहक विभाग/ यंत्रणा/अधिकारी |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा परिषद नाशिक | १) पानवेलीबाबत जिल्हा परिषदने बैठकीस बोलाविलेले सगुणा फाऊंडेशन व बचत गटाचे सादरीकरणाबाबत.<br>याबाबत जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दिपक पाटील यांनी पानवेलीच्या अनुषंगाने नेरळ येथील सगुणा रुरल फाउंडेशन हे तसेच पानवेलींपासुन वस्तु बनविण्याबाबत प्रशिक्षण दिलेल्या चांदोरी येथील बचतगटाच्या महिला सादरीकरणासाठी उपस्थित असलेबाबत नमुद केले.<br>• चांदोरी येथील महिला बचत गटाच्या श्रीमती राणी सुर्यवंशी व श्रीमती आरती कोटमे यांनी गोदावरीमधील पानवेलींपासुन तयार केलेल्या विविध वस्तु, पर्स, डायनिंग मॅट, बास्केट, फळ ठेवण्यासाठी ट्रे बाबत माहिती दिली. सद्या १० दिवसांचे प्रशिक्षण घेतले असुन पुढचे प्रशिक्षण घेतल्यावर काही नविन उपयोगी वस्तु, सोफाकव्हर, चप्पल इ. बनविता येतील. चांदोरी व इतर ६ गावांमधील ३५ महिलांनी प्रशिक्षण घेतले असुन त्यामध्ये बनविलेल्या १०० वस्तु ह्या पंचायत समिती येथे लावलेल्या स्टॉल मधुन सर्व वस्तु विक्री झाल्या असलेबाबत नमुद केले. वस्तु बनविण्यासाठी पानवेली ही मुळापासुन काढून ती पाण्याने स्वच्छ केली जाते. नंतर ४-५ दिवस पानवेली सुकवल्यावर त्याची जुडी बांधुन वाळवून तीचा रंग बदलू पर्यंत सुकविण्यात येते. वाळलेल्या पानवेलीपासून ज्यावेळी वस्तु तयार करावयाची असते त्यावेळी ती १५-२० मिनिटे ओली करावी लागते. जी वस्तु बनवायची आहे त्याप्रमाणे पानवेलीला आकार देऊन कापून घ्यावे लागते. दोन प्रकारे विणकाम करता येत असुन तयार झालेल्या वस्तुंना कोटींग, वॉर्निश कलर लावल्यावर त्याखराब होत नसलेबाबत माहिती दिली. | |
| | जिल्हा परिषद नाशिक | ➢ Fabindia, Amazon या सारखे Online marketplace यांचेशी Tie-up करता येईल का ते पाहावे किंवा GeM portal वर नोंदणी करता येईल का ते तपासावे. याव्यतिरिक्त पानवेलीपासुन ऑफिसमध्ये वापरता येतील असे Stationery items तयार होऊ शकता का ते देखील पाहावे. ऑफिसमध्ये कोणत्या गोष्टी वापरल्या जाऊ शकतात हे त्यांना अगोदर दाखविल्यास त्याप्रमाणे त्यांना वस्तु तयार करता येतील अशा सुचना दिल्या. | मु.का.अ जिल्हा परिषद |

| | | | |
|---|---|---|---|
| | | याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.दिपक पाटील यांनी नमुद केले की, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत २-३ Brand बनविले असुन त्यामध्ये काही भाज्यासंदर्भात असुन कापडांपासुन बनविलेल्या विविध वस्तू, पानवेलींपासून बनविलेल्या विविध वस्तुंबाबत आहे. याबाबतची वेबसाईट देखील प्रसिध्द केली असुन त्यावर ऑनलाईन विक्रीसाठी वस्तु उपलब्ध करुन दिल्या आहेत. तसेच बचतगटाच्या या महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी आसाम येथून प्रशिक्षक बोलावण्यात आले होते. त्यांनी ह्या महिलांना प्रशिक्षण दिले असुन ह्या महिला आता Master trainer म्हणून इतर बचत गटांच्या महिलांना प्रशिक्षण देणार असलेबाबत नमुद केले. | |
| | जिल्हा परिषद नाशिक | ➢ Processing मध्ये पानवेली सुकवण्यासाठी जास्त कालावधी लागत आहे. Dryer वापरुन काही Mechanization करता येईल का ते जिल्हा परिषदेने पाहावे अशा सुचना दिल्या. | मु.का.अ जिल्हा परिषद |
| | नाशिक महानगरपालिका | ➢ शहरी भागातही बचतगट असल्याने ग्रामीण भागाप्रमाणे शहरात देखील महानगरपालिकाने करावी. ट्रॅश स्किमरने काढलेली पानवेली नष्ट करण्यासाठी दुसरीकडे टाकण्याऐवजी वाहतूक करुन बचतगटांना मोफत उपलब्ध करुन दिली तर ते देखील करु शकतील अश्या सुचना दिल्या. | आयुक्त म.न.पा |
| | जिल्हा परिषद नाशिक | ➢ ग्रामीण भागातील बचतगटांनी ग्राम पंचायतशी Tie-up करुन महापालिकेने काढलेल्या पानवेली त्यांना वाहतूक करुन घेऊन जाता येतील. महापालिका व जिल्हा परिषदने याबाबत समन्वयाने काम करावे अश्या सुचना दिल्या. | आयुक्त म.न.पा, मु.का.अ जिल्हा परिषद |
| | | पानवेलींपासुन विविध वस्तू बनविणाऱ्या चांदोरी येथील बचत गटाच्या उपस्थित महिला यांचा सत्कार करणेबाबत याचिकाकर्ते श्री.पंडीत व श्री.पगारे यांनी नमुद केले. बचत गटाच्या उपस्थित महिलांचा समिती अध्यक्ष यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.<br>• नेरळ येथील सगुणा रुरल फाउंडेशनचे श्री. अनिल निवळकर यांनी नदीपात्रातील पानवेलींबाबत सादरीकरणाव्दारे माहिती दिली. पानवेलींमुळे पाण्याचा पुर्ण पृष्ठभाग झाकला जात असुन त्यामुळे सुर्यप्रकाश आतमध्ये खाली पोहचत नसल्याने नदीतील जलचरांना प्राणवायु मिळत नसलेबाबत नमुद केले. पानवेलींचे प्रकार, त्यांची होणारी वाढ, पानवेली काढण्यासाठी त्यावर सद्या होत असलेला खर्च याबाबत माहिती दिली. ठाणे येथील उल्हास नदी व संभाजीनगर येथील डॉ.सलीम अली तलाव येथे पानवेलीवर करण्यात आलेल्या ग्लायफोसेट तणनाशक फवारणी व केलेल्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली. तणनाशक फवारणी पुर्वीची नदीतील पानवेलींची स्थिती व तणनाशक फवारणीनंतर पानवेली काढल्यानंतरची नदीची स्थिती याबाबत माहिती दिली. ग्लायफोसेट फवारणी नंतर सदर ठिकाणी आलेले विविध प्रकारचे पक्षी व त्यांचा वाढलेला अधिवास तसेच मासेमारी व्यवसायामध्ये झालेली वाढ याबाबत माहिती दिली. सदर तणनाशकाने जमीन, पाणी किंवा जनावरांवर कोणतेही दुष्परिणाम होत नसलेबाबत नमुद केले.<br>➢ स्प्रे करण्याची पध्दतीबाबत विचारणा करण्यात आली.<br>• तीन प्रकारे स्प्रेचे काम करण्यात येत असुन किनाऱ्यावर किंवा जिथे कमी जागा आहे, गटारी आहे अशा ठिकाणी पाठीवर पंप घेऊन मॅन्युअल पध्दतीने स्प्रे केला जातो. दुसरी पध्दत होडीमध्ये मशीन ठेवून होडीतून नदीत जाऊन स्प्रे पंपाने काम केले जाते व तीसऱ्या पध्दतीमध्ये ड्रोन व्दारे स्प्रे केला जात असलेबाबत नमुद केले.<br>➢ या कामासाठी किती खर्च येतो याची विचारणा करण्यात आली.<br>• स्प्रेचे कामासाठी per kilometre साधारणपणे २ ते २.५ लाखच्या आतमध्ये | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | खर्च येत असुन स्प्रेनंतर पानवेली काढण्याची जबाबदारी ही महापालिका, जिल्हा परिषद किंवा स्थानिक ग्रामपंचायत यांची राहील याबाबत नमुद केले.<br>• जल शुध्दीकरणाच्या अनुषंगाने ज्या ठिकाणाहून अस्वच्छ पाणी येते त्याठिकाणी वाळा गवताचे Roots Bagtoons लावल्यास ते सर्व अस्वच्छ पाणी शोषून घेतात. वाळा गवत ही स्थानिक वनस्पती असुन पानवेलीपेक्षा चांगली आहे. तसेच कमळ देखील जल शुध्दीकरणाचे काम करत असुन नदीला येणारे ओढे, नाले, गटारींच्या ठिकाणी ते लावल्यास तेथून शुध्द पाणी येईल. पानवेलींप्रमाणे कमळ व वाळयाच्या गवतापासुन सुध्दा विविध वस्तु बनविता येतील असे नमुद केले.<br>• तसेच काही प्रकारचे मासे हे नदीत सोडल्यास ते नदीतील घाण, sewage खाण्याचे काम करतात. उल्हास नदीमध्ये ५० हजार बीज सुरवातीला सोडले असुन आता त्यामध्ये आपोआप वाढ होत असलेबाबत माहिती दिली. | |
| | नाशिक महानगरपालिका | सदर मुद्याचे अनुषंगाने मनपाचे उपआयुक्त श्री.मुंडे यांनी नमुद केले की, मागील महिन्यात वन्यजीव संस्थेची परीषद झाली असुन त्यामध्ये मत्स्यपालन विभागाचे संचालक आले होते. त्यांनी नाशिक येथील नदीत वेगळया प्रकारचे मासे सोडण्याची त्यांची इच्छा असल्याचे नमुद केले असुन त्यामुळे नदीची Ecological chain राखायला मदत होईल. याच्या संदर्भात ते महापालिकेशी Tie-up करणार आहे. त्यांना देखील मिटींगला बोलावले तर निश्चितपणे Ecological balance होण्यासाठी मदत होईल असे नमुद केले. तसेच सदर परीषद ही वेगवेगळ्या ठिकाणच्या नद्या संदर्भात होती. प्राध्यापक श्रीमती शिंदे मॅडम यांनी Biodiversity वर मागील १० वर्षापासून Study केलेली असुन त्यांनाही मिटींगला बोलावता येईल असे नमुद केले. | |
| | नाशिक महानगरपालिका | ➢ नदीतील पानवेली निर्मुलनाबाबत अगोदर निर्णय घ्यावा. त्यानंतर मासे सोडण्याबाबत विचार करता येईल. श्रीमती शिंदे मॅडम यांना पुढच्या मिटींगला महापालिकेने बोलवावे, त्यांच्याही विषयाचे पुढच्या मिटींगला सादरीकरण ठेवावे अश्या सुचना दिल्या. | आयुक्त म.न.पा |
| १. | NEERI | २) पानवेली काढण्याच्या यापध्दतीने मानवांवर दुष्परिणाम होत नसलेबाबत डॉ.गोयल यांनी नमुद केले.<br>➢ याबाबत २ वर्षापुर्वी चर्चा झालेली होती. याचिकाकर्त्यांनी पानवेलीवर फवारणीस विरोध केलेला होता. त्यावेळी ३ मुद्दे उपस्थित झालेले होते. पहिला मुद्दा सदरचे Product Internationally Banned आहे, दुसरा मुद्दा त्याचा Eco System वर परिणाम होतील व तिसरा मुद्दा Cost Effective नसल्याचा मुद्दा होता. त्यामुळे हा विषय थांबला होता. आता पानवेलीच्या अनुषंगाने याचिकाकर्त्यांचे जे काही मुद्दे असतील ते एकत्रित निरीचे डॉ.गोयल यांना आज पाठवा. डॉ.गोयल Study करुन त्याबाबत Opinion देतील अशा सुचना दिल्या. | याचिकाकर्ते, NEERI |
| | नाशिक महानगरपालिका, जिल्हा परिषद, NEERI, ना.म्यु.स्मार्ट सिटी डे.कॉ.लि. | ➢ दरम्यानच्या काळात स्मार्टसिटी, नाशिक महापालिका व जिल्हा परिषद यांनी देखील त्यांचे Issue निरीचे डॉ.गोयल यांना इमेलने पाठवावे व आजच्या बैठकीचे अनुषंगाने पुढच्या मिटींगपुर्वी त्यांचे Opinion मागविण्यात यावे. पुढील मिटींगमध्ये त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेऊ. Technical Opinion प्रमाणे पुढे कार्यवाही करता येईल. जिल्हा परिषद, स्मार्टसिटी व महापालिकेने डॉ.गोयल यांना इमेल करुन Opinion मागवा, उद्यापर्यंत इमेल पाठवा व CC मध्ये इमेल मला पाठविण्यात यावा अशा सुचना दिल्या. | आयुक्त म.न.पा, मु.का.अ जिल्हा परिषद, NEERI, मु.का.अ. स्मार्टसिटी |
| १. | ना.म्यु.स्मार्ट सिटी डे.कॉ.लि. | ३) De-Concretization बाबत..<br>➢ Concretization बाबत ह्या समितीने देखील विचार करावा असे स्मार्टसिटीचे | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चेअरमन यांनी सांगितले होते. त्यावर या समिती समोरही हा विषय बऱ्याच वेळा झाला असुन ह्या समितीने घेतलेला निर्णय हा त्यांना कळविलेला आहे. या समितीने दोन निर्णय घेतले असुन यापुढे कोणत्याही नदी किंवा नाल्यामध्ये तळाला Concretization करायचे नाही व ज्यांना या समितीचा निर्णय मान्य नसल्यास त्यांनी त्याविरुध्द उच्च न्यायालयात application दाखल करावे अशा सुचना दिलेल्या आहेत. तसेच दुसरा मुद्दा स्मार्टसिटीचे De-Concretization करण्याचे जे काम थांबलेले आहे त्याबाबत Technical Authority ही निरी असुन स्मार्टसिटीने त्यांचे Opinion घेतले असल्याचे यापुर्वी सांगितले होते ते नसेल घेतलेले तर स्मार्टसिटीने निरीचे Opinion घ्यावे व Technical Opinion प्रमाणे पुढचे राहीलेले काम करावे अशा सुचना दिल्या. | मु.का.अ.<br>स्मार्टसिटी |
| | ना.म्यु.स्मार्ट सिटी डे.कॉ.लि. | याबाबत स्मार्टसिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मोरे यांनी नमुद केले की, रामकुंडाप्रमाणे यापुढे Concretization करु नये असे निरीचे पुर्वीच्या अहवालात नमुद असुन Concretization काढणेबाबत निरीचे अहवालात स्पष्ट नमुद नाही. De-Concretization करणेबाबत स्वतंत्र Opinion घेतलेले नसल्याचे स्मार्टसिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मोरे यांनी नमुद केले. | |
| | तज्ञ सल्लागार | ➢ स्मार्टसिटीने निरीकडे पाठपुरावा करुन Opinion प्राप्त करुन घ्यावे अशा सुचना दिल्या.<br>➢ डॉ. बस्ते मॅडम यांनीही De-Concretization बाबत पुर्वी महापालिकेला सादर केलेला अहवाल निरीला इमेलने पाठवावा अशी सुचना दिली. | मु.का.अ.<br>स्मार्टसिटी<br>डॉ. प्राजक्ता बस्ते |
| १. | | ४) स्मार्टसिटीच्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त व महापालिका आयुक्त यांचा समितीने भेट देऊन अहवाल देणेबाबतचा मुद्या विषयी विचारणा करण्यात आली. | |
| | ना.म्यु.स्मार्ट सिटी डे.कॉ.लि. | जिल्हाधिकारी यांनी कॉंक्रीट काढू नये असे नमुद केले असुन परत चर्चा करुन निरीचे Opinion घेण्याचे ठरले असल्याने निरीकडे दि.२०/०६/२०२३ चे पत्रानुसार Opinion मागविले असल्याचे स्मार्टसिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मोरे यांनी नमुद केले. | मु.का.अ.<br>स्मार्टसिटी |
| | NEERI | याबाबत निरीचे डॉ.गोयल यांनी नमुद केले की, रामकुंडाचे De-Concretization बाबत स्मार्टसिटीने दि.२०/०६/२०२३ रोजी पत्र पाठविले असुन ते Head office ला डॉ.पारस पुजारी यांना पाठविले आहे. त्यांनी अद्याप काही कळविलेले नाही त्यांना पुन्हा reminder करतो असे नमुद केले. | NEERI |
| २. | नाशिक महानगरपालिका, ना.म्यु.स्मार्ट सिटी डे.कॉ.लि. | १) नदी व नाल्यांवरील अतिक्रमणाबाबत तक्रारी येत असल्याचा श्री.पंडीत यांनी मुद्या उपस्थित केला. ब्ल्युलाईन मधील बांधकामे, वस्त्रांतरगृह असलेबाबत नमुद केले.<br>➢ महापालिकेने अतिक्रमणाबाबत कार्यवाही करावी अश्या सुचना दिल्या. | आयुक्त म.न.पा,<br>मु.का.अ.<br>स्मार्टसिटी |
| ३. | नाशिक महानगरपालिका, ना.म्यु.स्मार्ट सिटी डे.कॉ.लि. | ➢ या कार्यालयाकडे आलेल्या तक्रारींची विचारणा करण्यात आली.<br>१) रामकुंड परिसरातील वाहतुकीच्या रस्त्यावर स्मार्टसिटीच्या अंतर्गत पोलिस चौकीच्या अतिक्रमित बांधकामाबाबत श्री.नंदन दीक्षित, पंचवटी नाशिक यांची दि.०२/०८/२०२३ रोजीची इमेल तक्रार.<br>➢ आजच्या बैठकीत चर्चा झाली नियमाप्रमाणे कार्यवाहीकामी सदर तक्रार महापालिकाकडे पाठविण्यात यावी. | आयुक्त म.न.पा,<br>मु.का.अ.<br>स्मार्टसिटी |
| | नाशिक महानगरपालिका | २) मा.उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार नदीपात्रा जवळील अतिक्रमित/अनधिकृत लोखंडी शेडवर कारवाई होणेबाबत श्री.दीपक कुलकर्णी, पंचवटी नाशिक यांची दि.२२/०८/२०२३ रोजीची इमेल तक्रार.<br>➢ सदर तक्रार यापुर्वी कार्यवाहीकामी महापालिकाकडे पाठविण्यात आलेली | आयुक्त म.न.पा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आहे अद्याप अहवाल आलेला नाही. महापालिकेने तक्रारीवर कार्यवाही करुन तक्रारदारास उत्तर पाठवुन त्याची प्रत सादर करावी. | |
| | नाशिक महानगरपालिका | ३) निळ्या पुररेषेतील बांधकामा बाबत श्री. राजेश पंडीत यांच्या दि.०६/०६/२०२२ रोजीच्या तक्रारीबाबत.<br>➢ महापालिकाचा अहवाल अद्याप आलेला नाही. महापालिकेने तक्रारीवर कार्यवाही करुन तक्रारदारास उत्तर पाठवुन त्याची प्रत सादर करावी. | आयुक्त म.न.पा |
| | म.प्र.नि.मंडळ नाशिक | ४) कोपरगाव येथील गोदावरी नदी प्रदुषणाबाबत श्री.आदिनाथ गोरखनाथ ढाकणे यांची दि.२०/६/२०२२ रोजीची इमेल तक्रारीबाबत<br>➢ प्रदुषण नियंत्रण मंडळाचा अहवाल अप्राप्त आहे. तक्रारीवर केलेल्या कार्यवाही बाबत तक्रारदारास उत्तर पाठवुन त्याची प्रत सादर करावी. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | नाशिक महानगरपालिका | ५) गोदावरी पात्रातील पाणवेली न काढले बाबत व इतर श्री.कैलास दिनकरराव देशमुख यांच्या दि.०४/०७/२०२२ रोजीच्या तक्रार.<br>• सदर तक्रार निर्गत झाली आहे त्याचे उत्तर पाठवतो असे मनपा उपआयुक्त श्री.मुंडे यांनी नमुद केले.<br>➢ उत्तर आल्यावर ही तक्रार बंद करण्यात यावी. | आयुक्त म.न.पा |
| | नाशिक महानगरपालिका | ६) गोदावरी नदीत निळ्या पुररेषेत होत असलेल्या अवैध बांधकामाबाबत श्री.जगबीर सिंग व इतर २ यांनी दि.११/१०/२०२२ रोजी केलेल्या तक्रारीबाबत<br>➢ महापालिकाचा अहवाल आलेला नाही. महापालिकेने तक्रारीवर कार्यवाही करुन तक्रारदारास उत्तर देऊन त्याची प्रत सादर करावी. | आयुक्त म.न.पा. |
| | नाशिक महानगरपालिका | ७) रामकुंडाच्या तळातील कॉंक्रीट संदर्भात श्री गंगा गोदावरी पंचकोठी (पुरोहित) संघ यांची दि.१७/०३/२०२३ रोजीचा अर्जाबाबत.<br>➢ महापालिकेने तक्रारदारास उत्तर पाठवुन त्याची प्रत सादर करावी. | आयुक्त म.न.पा. |
| | नाशिक महानगरपालिका, म.प्र.नि.मंडळ | ८) No Action on Plastic Carry bags बाबत मनपा व एमपीसीबी कारवाई करत नसलेबाबत श्री.जगबीर सिंग यांची दि.१०/०५/२०२३ रोजीची तक्रार.<br>➢ महापालिका व एमपीसीबीने तक्रारदारास उत्तर पाठवुन त्याची प्रत सादर करावी. | आयुक्त म.न.पा, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | नाशिक महानगरपालिका | ९) गोदावरी नदीच्या निळ्या रेषेतील अतिक्रमण काढणेबाबत श्री.जगबीर सिंग यांची दि.१०/०५/२०२३ रोजीची तक्रार.<br>➢ महापालिकेने तक्रारदारास उत्तर पाठवुन त्याची प्रत सादर करावी. | आयुक्त म.न.पा. |
| | नाशिक महानगरपालिका | १०) निळ्या पुर रेषेतील बांधकामेबाबत श्री.राजेश पंडीत यांची दि.१२/०५/२०२३ रोजीची इमेल तक्रार.<br>➢ महापालिकेने तक्रारदारास उत्तर पाठवुन त्याची प्रत सादर करावी. | आयुक्त म.न.पा. |
| | जिल्हाधिकारी नाशिक, जिल्हापरिषद नाशिक, नाशिक महानगरपालिका | ११) जलपर्णीची विल्हेवाट लावणे संदर्भात श्री.रविंद्र अमृतकर यांचे दि.१३/०५/२०२३ रोजीचे पत्र.<br>➢ पाणवेलीच्या प्रश्नासंबंधी सहभागी करुन घेणेबाबत श्री.रविंद्र अमृतकर यांचे म्हणने होते. जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेशी चर्चा करणेबाबत कळविले होते. महापालिकानेही यांचेशी बैठक घेऊन चर्चा करावी. | आयुक्त म.न.पा., जिल्हाधिकारी, मु.का.अ. जिल्हा परिषद |
| | नाशिक महानगरपालिका, जिल्हापरिषद नाशिक, ना.औ.वि.केंद्र एकलहरे | १२) गोदावरी नदीचे जलप्रदुषण आणि त्याचा एकलहरे गावातील रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम होत असलेबाबत सरपंच ग्रामपंचायत एकलहरे यांचा दि.२१/०३/२०२३ रोजीचा अर्ज.<br>• याबाबत नाशिक औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री.पुणेकर यांनी नमुद केले की, विद्युत केंद्रासाठी गोदावरीमधुन उचलले सर्व पाणी रिसायकल केले जाते, विद्युत केंद्रात इतर उपयोगासाठी पाणी वापरले जाते. विद्युत | आयुक्त म.न.पा., मु.का.अ. जिल्हा परिषद, ना.औ.वि.केंद्र एकलहरे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | केंद्रातुन वापरलेले कोणतेही पाणी नदीमध्ये सोडले जात नाही. Zero Discharge आहे. नदीमधुन पाईपलाईनव्दारे पंपाने जे पाणी घेतले जाते. त्यापैकी जास्त झालेले पाणी विद्युत केंद्रात वापरण्यापुर्वीच परत नदीमध्ये सोडले जाते. सदरचे पाणी उंचावरुन खाली पडत असल्याने तेथे फोम तयार होत असल्याचे नमुद केले.<br>➢ उंचावरुन पाणी सोडण्याऐवजी अन्य पर्यायी व्यवस्था करावी अशी सुचना केली.<br>➢ महापालिकेने सर्व विभागांकडील तक्रारींचा एकत्रीत अहवाल सादर करावा अशी सुचना केली.<br>➢ सर्व तक्रारीची यादी करुन संबंधीत विभागास पाठविण्यात यावी. तक्रारींची संबंधीत विभागाकडून आलेली उत्तरे ही यापुढे बैठकीमध्ये ठेवण्यात यावी. | ना.औ.वि.केंद्र<br>आयुक्त म.न.पा.<br>उपआयुक्त (करमणुक) |
| ४. | पोलिस विभाग नाशिक | पोलिस विभागाने गोदावरीसाठी स्वतंत्र मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेच्या अनुषंगाने सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेबाबत श्री.पंडीत यांनी मुद्दा उपस्थित केला.<br>याबाबत उपस्थित पोलिस निरिक्षक श्री.बगाडे यांनी नमुद केले की, विधी अधिकारी व वरिष्ठांशी चर्चा करुन कार्यवाही करणार असलेबाबत नमुद केले.<br>➢ समितीने यापुर्वी दिलेल्या निर्देशाप्रमाणे गोदावरीसाठी स्वतंत्र पोलिस मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे शक्य नसल्याची बाब सिव्हील ॲप्लीकेशन व्दारे मा.उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून द्यावी. पुढील बैठकीपुर्वी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्याची कार्यवाही करुन त्याची प्रत इकडेस पाठविण्यात यावी अश्या सुचना दिल्या. | पोलिस आयुक्त |
| ५. | म.औ.वि.म. नाशिक<br>नाशिक महानगरपालिका<br>म.औ.वि.म. नाशिक<br>नाशिक महानगरपालिका | CETP बाबत महापालिका व एमआयडीसी सद्यस्थितीची विचारणा करण्यात आली.<br>याबाबत मनपाचे अधिक्षक अभियंता श्री.धर्माधिकारी यांनी नमुद केले की, अहवालाचे अनुषंगाने बऱ्याच त्रुटी निघाल्या असुन काही मुद्दे उपस्थित केलेले आहे ते एमआयडीसीला कळवले असल्याचे नमुद केले.<br>➢ एमआयडीसीने पुर्तता अहवाल दिला की, प्रत्येक वेळी महापालिका नविन मुद्ये उपस्थित करते. एकाचवेळी सर्व मुद्दे उपस्थित करुन त्यांना त्रुटी कळवा.<br>म.औ.वि.महामंडळाचे कार्यकारी अभियंता श्री.जयवंत बोरसे यांनी नमुद केले की, महानगर पालिकेने शेवटच्या त्रुटी मे महिन्यात काढल्या होत्या. त्याबाबतचा पुर्तता अहवाल जुन महिन्यात सादर केलेला आहे. आतापावेतो तीनवेळा compliance झालेला आहे. निरी, एमआयडीसी, एमपीसीबी व मनपा यांच्या तीन मिटींग सुध्दा झालेल्या आहेत. मनपाला ज्या अटी-शर्ती लिहून पाहिजे होत्या त्यासुध्दा लिहून दिल्या असल्याचे नमुद केले.<br>➢ यासाठी महापालिका आयुक्त बैठकीस हजर असणे आवश्यक असते. महापालिका आयुक्त नसल्याने सदर विषयाबाबत निर्णय होऊ शकला नसल्याचे इतिवृत्तामध्ये नमुद करण्यात यावे असे सुचित केले. | आयुक्त म.न.पा.<br>आयुक्त म.न.पा. |
| ६. | सर्व उपसमिती | उपसमिती ह्या दरमहिन्याला बैठका घेत नाही. या समितीची त्रैमासिक बैठक जाहीर झाल्यावर त्याचे ८-१० दिवस अगोदर बैठका घेत असलेबाबत श्री.पगारे यांनी मुद्दा उपसिथत केला.<br>➢ सर्व उपसमिती यांनी नियमित वेळेवर बैठका घ्याव्यात अशी सुचना केली. | सर्व उपसमिती |
| ७. | म.प्र.नि.मंडळ नाशिक | १) मनपा व एमपीसीबी यांचे Joint sampling मध्ये Bod, Cod Value बाबत विचारणा करण्यात आली.<br>मनपा व एमपीसीबीने मागे Sampal घेतले होते ते मॅच होत असलेबाबत श्री.धर्माधिकारी यांनी नमुद केले. | आयुक्त म.न.पा., प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | म.प्र.नि.मंडळ नाशिक | २) Untreated water महापालिका सोडत असलेबाबत बातम्या येतात त्याबाबत एमपीसीबी यांना विचारणा करण्यात आली.<br>STP मधुन १० Bod Standard parameters प्राप्त होत नाही. महापालिकेचे STP २०-३० Bod ह्या Parameters ला डिझाईन असुन त्याच्याशी मॅच होतात. परंतु STP चे Upgradation महापलिकेला करावे लागेल असे म.प्र.नि.मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी श्री.दुर्गुळे यांनी नमुद केले.<br>➢ STP ज्या नॉर्मसचे आहेत त्याप्रमाणे discharge आहे किंवा नाही याची एमपीसीबीने नियमित तपासणी करावी अशी सुचना केली. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | नाशिक महानगरपालिका | ३) STP Upgradation बाबत विचारणा करण्यात आली.<br>Upgradation बाबत वेगवेगळया संस्थानी प्रस्तावामध्ये त्रुटी काढल्या असुन त्याबाबत एकत्रित बैठक घेऊन Presentation व्दारे त्रुटी पुर्तता करण्यात येणार आहे. DPR मध्ये IIT ने काही मुद्दे काढले आहेत त्याबाबत महापालिकेचे अभियंते यांचेसोबत चर्चा केली असता अजुन काही मुद्दे उपस्थित झाले आहेत. शासनाच्या महाप्रित कंपनी या Consultant यांना देखील बैठकीला बोलावणार असुन त्यामधुन Solution काढणार असल्याचे मनपाचे अधिक्षक अभियंता श्री.धर्माधिकारी यांनी नमुद केले.<br>सदर कार्यवाहीस किती कालावधी लागेल याबाबत श्री.पंडीत यांनी मुद्दा उपस्थित केला.<br>Solution १५-२० दिवसात निघु शकेल असे श्री.धर्माधिकारी यांनी नमुद केले. | आयुक्त म.न.पा. |
| | नाशिक महानगरपालिका | ➢ श्री.धर्माधिकारी यांनी १५-२० दिवसात हा प्रश्न सोडवला जाईल असे आश्वासन दिले असल्याचे आजच्या इतिवृत्तामध्ये नमुद करावे असे सुचित केले.<br>CETP व Upgradation हे दोन्ही मुद्यांवर कार्यवाही करतो असे मनपाचे अधिक्षक अभियंता श्री.धर्माधिकारी यांनी नमुद केले.<br>४) मध्यंतरी गटारीचे पाणी नदीत जात असल्याने महापालिकेवर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी श्री.पगारे यांनी केली. | आयुक्त म.न.पा.<br>आयुक्त म.न.पा. |
| | म.प्र.नि.मंडळ नाशिक | ➢ उपसमितीने Joint visit करावी व महापालिका, Industries जे दोषी असतील अशा सगळ्यांवर कारवाई करावी अश्या सुचना दिल्या. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | म.प्र.नि.मंडळ नाशिक | ➢ Raw water सोडलेली ठिकाणे, लिकेजेस असलेली ठिकाणे शोधुन तेथे एमपीसीबीने कारवाई करावी अश्या सुचना दिल्या. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | म.प्र.नि.मंडळ नाशिक | ➢ शहरात अनेक ठिकाणी Redevelopment चालू असुन नव्याने बिल्डींग होत आहेत. तीथे ड्रेनेजचा discharge जास्त असल्याने सिवेज स्ट्रॉम वॉटर लाईनला जोडून दिले आहे अशी ठिकाणे तुम्ही verify करुन कारवाई करा. ज्या-ज्या बिल्डींगला STP cumpulsary आहेत त्यांचे STP सुरु आहेत किंवा नाही याची एमपीसीबीने तपासणी करुन कारवाई करावी अश्या सुचना दिल्या. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | नाशिक महानगरपालिका | ➢ महापालिकेने देखील अश्या ठिकाणांचे सिवेज बंद करण्याची कारवाई सुरू करावी. त्याठिकाणचे बिल्डर्स, डेव्हलपर्स यांना छोटे STP बसवायला लावा. नगररचना विभागाला लेखी सुचना द्या. Zero discharge building करायला लावणेबाबत सुचना दिल्या. | आयुक्त म.न.पा. |
| | म.प्र.नि.मंडळ नाशिक | ➢ इंजिनिअरींग कॉलेज, आर्किटेक्चर कॉलेज, गर्व्हमेंट पॉलिटेक्निक कॉलेज यांचेकडे Environmental Science विषय विद्यार्थ्यांना शिकवला जातो एमपीसीबीने त्यांची मदत घेऊन प्रोजेक्ट रिपोर्ट करुन घ्यावा. त्यांचे रिपोर्टसवर महापालिकेला कारवाई करायला लावा व कायद्यामधील तरतुदीनुसार महापालिकेवर कारवाई सुरू करावी अश्या सुचना दिल्या. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | म.प्र.नि.मंडळ<br>नाशिक<br><br><br><br><br>नाशिक<br>महानगरपालिका<br><br>म.प्र.नि.मंडळ<br>नाशिक | ➢ Untreated water जिथे-जिथे नदीत सोडले असेल तीथे एमपीसीबीने कारवाई करावी. महापालिका, कंपन्या यांना नोटीसा द्या, गरज पडल्यास Prosecution दाखल करावे. एमपीसीबीने पुढच्या मिटींगला केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा अश्या सुचना दिल्या.<br>५) कचरा डेपो मधुन leaching होत असल्याचे शेतकऱ्यांची निवेदन असलेबाबत विचारणा करण्यात आली.<br>कचरा डेपो मधील STP मधुन लिकेज होत होते त्याची दुरुस्ती चालू असलेबाबत श्री.धर्माधिकारी यांनी नमुद केले.<br>➢ महापालिकेने दुरुस्ती तातडीने करावी अशी सुचना केली.<br>➢ एमपीसीबीने वर्तमानपत्रात येणाऱ्या बातम्यांच्या अनुषंगाने Su-moto दखल घेऊन कारवाई करावी अश्या सुचना दिल्या. | प्रादेशिक अधिकारी<br>म.प्र.नि.मंडळ<br><br><br><br><br><br><br>आयुक्त म.न.पा.,<br>प्रादेशिक अधिकारी<br>म.प्र.नि.मंडळ |
| ८. | विभागीय माहिती<br>कार्यालय | विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक श्री.इगवे यांनी प्रचार व प्रसिध्दी उपसमितीने केलेल्या कामांबाबत पुढील प्रमाणे माहिती दिली.<br>आकाशवाणीच्या नाशिक केंद्रावर मे महिन्यात जीवनसरिता नदीची स्वच्छता व प्रदुषण दुर करण्यासाठी ११ भाग प्रसारित केले आहेत. श्री.राजेश पंडीत तसेच श्री.चिन्मय उदगीरकर यांची मुलाखत केली आहे.<br>➢ आकाशवाणीचा चांगला वापर करावा. ग्रामीण भागात आज देखील आकाशवाणी भरपुर लोक ऐकतात. गोदावरी प्रदूषण निर्मुलनासाठीचे काम करणारे तसेच पर्यावरण विषयक चांगले काम करणारे, जनजागृती करणारे यांना आकाशवाणीवर बोलवुन त्यांच्या मुलाखती प्रसारित कराव्या अश्या सुचना दिल्या.<br>➢ शहरातील तरुणपिढी एफ.एम. ऐकते. एफ.एम.केंद्र, आकाशवाणी यांना रेनवॉटर हार्वेस्टिंग, पानवेली, प्लास्टिक अशा वेगवगळया थिम व प्रोग्राम दिल्यास गोदावरीमध्ये होणारे प्रदूषण रोखण्यास जनजागृतीव्दारे मदत होईल असे सुचित केले. | <br><br><br><br><br>उपसंचालक<br>विभागीय माहिती<br><br><br><br>उपसंचालक<br>विभागीय माहिती |
| ९. | - | इको-फ्रेंडली मोहरमचे चांगले काम करणारे व गोदावरी गीतच्या लेखीका यांचा सत्कार करणेबाबत श्री.पंडीत व श्री.पगारे यांनी नमुद केले.<br>महापालिकेच्या शाळेमध्ये गायले जाणारे गोदावरी गीताच्या लेखीका श्रीमती सुरेखा बोऱ्हाडे यांचा समिती अध्यक्ष यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.<br>इको-फ्रेंडली मोहरम तसेच रेनवॉटर हार्वेस्टिंगचे चांगले काम करणाऱ्या बोहरी समाजाचे उपस्थित प्रतिनिधी यांचा समिती अध्यक्ष यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.<br>रेनवॉटर हार्वेस्टिंग व ग्राउंड वॉटर रिचार्जचे चांगले काम करणाऱ्या परमानंद स्पोर्टस अकॅडमीच्या श्रीमती अपर्णा कोठावळे यांचा समिती अध्यक्ष यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. | - |
| १०. | उपसमिती/<br>यंत्रणा/विभाग | याव्यतिरिक्त यापुर्वीच्या वेळोवेळी झालेल्या बैठका व त्यांचे इतिवृत्तात दिलेल्या सुचनेप्रमाणे संबंधित उपसमिती/यंत्रणा/विभागांनी योग्यती कार्यवाही करावी. | संबंधीत उपसमिती/<br>विभाग/अधिकारी |

वरील प्रमाणे चर्चा होऊन उपस्थितांचे आभार मानुन बैठकीचे कामकाज संपविणेत आले.

Signed by
Radhakrishna Vithalrao Game
Date: 04-09-2023 17:58:38

(राधाकृष्ण गमे)
**समिती अध्यक्ष तथा**
**विभागीय आयुक्त, नाशिक**

स्थळ:- नाशिकरोड
दि. 04/09/2023
क्र.कक्ष-15/क.शु./ज.या.176-2012/कावि/415/2023

**प्रत :- सर्व संबधीत यांना इमेलव्दारे..**